# अंतरलहरी

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

सप्टेंबर - डिसेंबर २०११ वर्ष ४ अंक ३ पृष्ठे ८ रु. २/-



## आध्यात्मिक गुरू कशाला?

*प्रश्न :* गुरू अनावश्यक आहेत असे आपण म्हणता, पण केवळ गुरूच देऊ शकेल अशा सुज्ञपणाच्या सल्ल्याशिवाय व मदतीशिवाय मला सत्य कसे सापडणार?

*कृष्णमूर्ती :* 'गुरूची आवश्यकता आहे की नाही' हा प्रश्न आहे. सत्य हे दुसऱ्याच्या मार्फत सापडू शकते का? काही लोक 'तसे सापडू शकते' असे म्हणतात तर काही लोक 'नाही' म्हणतात. आपल्याला यातील सत्य जाणायचे आहे, 'दुसऱ्याच्या मताविरुद्ध माझे मत' असे पाहायचे नाही. मला या विषयात मत असे काही नाही. एक तर सत्य दुसऱ्याच्या मार्फत सापडत असेल किंवा नसेल. तुम्हाला गुरूची आवश्यकता आहे की नाही हा प्रश्न कोणाच्या मताचा नाही. मत कितीही खोल विचाराचे असो, पांडित्यपूर्ण असो, लोकप्रिय असो, सार्वत्रिक असो, या विषयातील सत्य त्या मतावर अवलंबून नसते. खरे काय आहे ते वस्तुत: शोधून काढावयाचे असते.

पहिला प्रश्न म्हणजे, आपल्याला गुरूची गरज का भासते? आपण गोंधळलेले असतो व गुरू मदत करणारा आहे अशा भूमिकेतूनच आपल्याला गुरू हवा असे आपण म्हणत असतो. आपण म्हणतो की तो सत्य काय आहे ते दाखवून देईल, आपल्याला समजून घेण्यास साहाय्य करील, आपल्यापेक्षा त्याला जीवनाबद्दल पुष्कळ ज्ञान आहे; तो पित्याप्रमाणे आपल्याशी वागेल, शिक्षकाप्रमाणे आपल्याला जीवनात काही शिकवील, तो अनुभवाचा सागर आहे आणि आपला अनुभव अगदी तुटपुंजा आहे; तो त्याच्या विशाल अनुभवातून आपल्याला मदत करील; असे अनेक प्रकारचे आपले विचार असतात. म्हणजेच, मूलत: आपण गोंधळलेले असतो म्हणूनच आपण शिक्षकाकडे जातो. तुम्ही नि:संशय स्पष्ट असलात तर तुम्ही गुरूजवळ फिरकणार नाही. यातील रहस्य, याचे महत्त्व तुम्ही ओळखाल अशी आशा आहे. तुम्ही भ्रमात पडलेले असता म्हणूनच गुरू शोधता. जीवनाचा मार्ग तुम्हाला गुरूने दाखवावा, तुमचा भ्रम दूर करावा, सत्य तुम्हाला त्याने शोधून द्यावे यासाठीच तुम्ही गुरूकडे जाता. तुम्ही तुमचा गुरू निवडता, कारण तुम्ही गोंधळून गेलेले असता आणि तो तुमची मागणी पुरी करील अशी तुम्हाला आशा वाटते. म्हणजेच जो गुरू तुमच्या संशयाचे निराकरण करून तुमचे समाधान करील तोच गुरू तुम्ही निवडता, तो तुम्हाला खूश करील या अपेक्षेनेच व त्याप्रमाणेच तुम्ही गुरूची निवड करता, आणि स्वत:चे समाधान कसे होईल यावरच तुमची निवड अवलंबून असते. 'तुम्ही स्वत:वरच भिस्त ठेवा, स्वावलंबी व्हा!' असे सांगणारा गुरू तुम्हाला नको असतो; तुमच्या पूर्वग्रहानुसारच तुम्ही गुरू पसंत करता. म्हणजेच, तुम्ही आपल्याला समाधान देईल असाच गुरू पसंत करीत असल्यामुळे तुम्हाला सत्याचा शोध नकोच असतो. तुम्हाला फक्त गोंधळातून बाहेर पडायला वाट हवी असते आणि त्या वाटेलाच चुकीने सत्य मानले जाते.

एखादा गुरू आपला गोंधळ निरसन करील ह्या कल्पनेचीच आपण प्रथम तपासणी करुया. आपला गोंधळ दुसरा कोणी कधी निरसन करू शकतो का? गोंधळ तर आपल्या प्रतिक्रियांमधूनच उत्पन्न झालेला असतो. तो आपणच निर्माण केलेला असतो. तुम्हाला तो दुसऱ्या कोणी निर्माण केला आहे असे वाटते का? ही विपन्नावस्था, जीवनातल्या सर्व थरांवरील ही लढाई, हा अंतर्बाह्य संघर्ष दुसऱ्या कोणी निर्माण केला आहे का? आपल्याला स्वत:चे पुरते ज्ञान नाही त्यामुळेच तो उत्पन्न झाला आहे. आपण आपल्याला स्वत:ला ओळखलेले नसते. आपले संघर्ष, आपल्या प्रतिक्रिया, दु:खे आपण नीट समजून घेत नाही. म्हणून जो गुरू आपल्या गोंधळातून आपली सुटका करील असे आपल्याला वाटते त्या गुरूकडे आपण जातो. आपण आपल्याला ओळखू शकतो ते वर्तमानकाळाशी असलेल्या संबंधातूनच; आणि तो संबंध हाच खरा गुरू आहे; बाहेरचा कोणी नाही. मला जर हा संबंध कळत नसेल तर गुरू जे काही सांगेल ते व्यर्थ असते; कारण माझी मालमत्ता, माझे संकल्प, कल्पनाविश्व, इतर लोक यांच्याशी असलेले माझे नाते, माझा संबंध, मला आकलन होत नसेल तर माझा संघर्ष दुसरा कोण मोकळा करू शकणार आहे? तो संघर्ष सोडवून घेण्यासाठी तो माझा मीच समजून घेतला पाहिजे; म्हणजेच परस्परसंबंधामध्ये मला माझे भान असले पाहिजे. हे भान असण्यासाठी गुरूची जरुरीच नाही. मला माझे स्वत:चे ज्ञान नसेल तर गुरूचा काय उपयोग? ज्यांची निवडही मूढपणाची असते असे गोंधळलेले लोक जसा राजकीय पुढारी निवडतात, तसा मीही एक गुरू शोधत असतो, निवडीत असतो. मी त्याची निवड माझ्या गोंधळानुसारच करू शकणार, आणि म्हणूनच तोही राजकीय पुढाऱ्यांइतकाच गोंधळलेला असतो.

माझे म्हणणे बरोबर आहे की, गुरूची जरुरी जे प्रतिपादन करतात त्यांचे म्हणणे बरोबर आहे हे पाहणे महत्त्वाचे नाही; तुम्हाला गुरूची गरज का आहे हे शोधून काढणेच महत्त्वाचे आहे. लोकांची अनेक प्रकारे पिळवणूक करणारे, लुबाडणारे अनेक बुवा, महाराज वगैरे असतात. पण तो मुद्दा अप्रस्तुत आहे. तसेच तुमची प्रगती कशी चालली आहे ते कोणी सांगितले तर तुम्हाला बरे वाटते, समाधान वाटते, तेही वाटो; पण तुम्हाला गुरूची गरजच का वाटावी, ह्या प्रश्नातच खरी किल्ली आहे. जरी तुम्ही गुरू केला असला तरी काय? दुसरा माणूस तुम्हाला फक्त ढोबळ मार्गदर्शन करू शकेल. पण जे काय करायचे ते सारे तुम्हालाच करायचे असते. ते करायची, वस्तुस्थितीला तोंड द्यायची तुमची तयारी

## संपादकीय

'गुरू' ह्या शब्दाला अनेक वलये आहेत. आपण त्यातील आध्यात्मिक वलयाशी संबंधित विचार करणार आहोत. कारण आजकाल 'टेक् गुरू' (तंत्रज्ञान गुरू) नावाची देखील एक संज्ञा आहे. कदाचित पुरातन कालात गुरूची ही दोन रूपे वेगळी नव्हती. शस्त्रविद्या शिकवणाराच जीवनज्ञान, अध्यात्म शिकवत होता. फार खोलात जाऊन ह्याचे विश्लेषण करण्यापेक्षा आपण गुरूची थोडी व्यापक भूमिका व तिची मानवी मनावरील पकड पाहण्याचा प्रयत्न करुया. मग कदाचित कृष्णमूर्ती गुरू का नाकारतात हे थोडे स्पष्ट होईल.

व्यास, वसिष्ठ, विश्वामित्र, पराशर यांसारखे गुरू राजकारण, समाजकारण, वैयक्तिक समस्या ह्यासंबंधी राजघराण्यापासून सर्वसाधारण माणसापर्यंत सर्वांना मार्गदर्शन करत होते. आज देखील आणि विशेषत: गेल्या शतकात पौर्वात्य देशांमधून अनेक गुरू आपल्या मार्गदर्शन करण्याच्या क्षमतेच्या सामर्थ्याने जगाच्या प्रसिद्धिपटलावर विराजमान आहेत. पाश्चात्त्य समाज तर त्यात खूपच रस दाखवत आहे.

त्यांच्या कार्याचे मूल्यांकन करण्याचा येथे अजिबात हेतू नाही. त्याहून काहीतरी व्यापक, सखोल पाहता आले तर बघण्याचा प्रयत्न आहे.

ह्या गुरुपरंपरेची मानवाला का गरज वाटते? गरजेशिवाय बाजारात काही येत नाही आणि आले तर टिकत नाही. ज्या अर्थी ही परंपरा टिकून आहे त्या अर्थी तिला मागणी आहे. ती मागणी साधीसुधी नाही, ती उत्कट मागणी आपल्या असहाय मनाची तीव्र हाक आहे. बाह्य आधाराची तळमळ आहे.

हे मन असहाय का? त्याला बाह्य साहाय्याची गरज का पडते? मनाला जेव्हा कळेल की मानसिक स्तरावर बाह्य मदत हा भ्रम आहे, तेव्हा मग ते गुरू शोधणार नाही. त्या वेळी ते कदाचित एकटे पडेल, पण खोट्या अपेक्षेने चुकीचा आधार शोधणार नाही. त्यातून मन समर्थ होण्याची शक्यता आहे. हे शक्य झाले तर गुरुसंप्रदाय संपतील व त्यातून निर्माण होणारे बाजारीपण संपेल.

---

नसते. म्हणून तुम्ही गुरूवर जबाबदारी टाकता, पण तीळभर जरी आत्मज्ञान असेल तरी गुरू निरर्थक ठरतो. कोणताही गुरू, कोणताही ग्रंथ किंवा धर्मशास्त्र तुम्हाला आत्मज्ञान देऊ शकणार नाही. प्रत्यक्ष आचरण, इतरांशी येणाऱ्या संबंधात, तुम्ही सावधान असलात तर ते उदयास येते. *असणे* म्हणजे संबंधित राहणे. या संबंधाची समजूत नसणे हीच विपत्ती होय, मालमत्तेशी तुमचे नाते काय आहे याची जाणीव नसणे हे गोंधळाचे एक कारण आहे. मालमत्तेशी तुमचा योग्य संबंध काय तो जर तुम्हाला कळला नाही तर तुमच्यामध्ये संघर्ष उत्पन्न होणारच. आणि त्यातूनच समाजातील संघर्षही वाढणार. तुमची पत्नी व तुम्ही यांचा संबंध, तुमचे मूल व तुम्ही यांचा संबंध काय आहे ते तुम्हाला कळत नसले तर, त्या संबंधातून उत्पन्न होणारा संघर्ष दुसरा कोणी कसा सोडवू शकणार? हीच गोष्ट तुमच्या कल्पना व तुमच्या समजुतींची; तुमच्या व इतर लोकांच्या परस्परसंबंधात गोंधळ आल्याने तुम्ही व मालमत्ता, तुम्ही व कल्पना, यांच्यामधील नात्यात भ्रान्ती उत्पन्न झाल्याने तुम्ही गुरू शोधता. तो खरा गुरू असेल तर तो तुम्हाला स्वत:ला ओळखण्यास सांगेल. साऱ्या गैरसमजुती आणि गोंधळ यांचे उगमस्थान तुम्हीच आहात; आणि तुम्ही जेव्हा प्रत्यक्ष परस्परसंबंधातच स्वत:चे सावधानतेने आकलन करून घ्याल तेव्हाच तुम्ही स्वत: तो संघर्ष मिटवू शकाल.

दुसऱ्या कोणाच्याही द्वारा तुम्हाला सत्य सापडू शकणार नाही. तुम्हाला ते कसे शक्य आहे? सत्य ही स्थिर अशी वस्तू नव्हे. त्याला विशिष्ट निवासस्थान नाही. सत्य हा कशाचा तरी शेवट नव्हे, ते ध्येय नव्हे. ते तर चेतन, तरल, जिवंत असते. तो शेवट कसा असू शकेल? सत्य हा स्थिरबिंदू असला तर ते सत्य राहत नाही. मग ते फक्त मत असते. सत्य हे अज्ञात असते, आणि जे मन त्याचा शोध घ्यायला धडपडते त्याला ते कधीच सापडणार नाही; कारण मन हे ज्ञात गोष्टींचे घडलेले असते, ते भूतकाळातून निर्माण झालेले असते, कालाचे अपत्य असते – हे तुम्ही स्वत: निरीक्षण करून पाहू शकता. मन हे ज्ञात वस्तूंचे साधन आहे म्हणून त्या साधनाने अज्ञात कधीही गवसणार नाही. मनाची धाव फार तर एका ज्ञात गोष्टीपासून दुसऱ्या ज्ञात गोष्टीपर्यंत असते. मन जेव्हा सत्याचा शोध घ्यायला निघते, ते पुस्तकातून ज्याचे वर्णन केलेले असते त्या सत्याचा शोध घेऊ जाते, तेव्हा ते 'सत्य' स्वत:च कल्पिलेले, प्रक्षेप केलेले असते; त्यावेळी मन हे ज्ञात अशाच गोष्टीच्या मागावर असते; ती ज्ञात गोष्ट पूर्वीच्या ज्ञातापेक्षा जास्त संतोषदायक असते एवढेच. इतकेच नव्हे, तर मन स्वत: होऊन जेव्हा सत्य जाणण्यासाठी प्रयत्न करते तेव्हा ते स्वत:चा प्रक्षेपच शोधीत असते. सत्य शोधीतच नसते. कारण, काही झाले तरी आदर्श किंवा ध्येय हे त्याने स्वत: कल्पिलेले असते, ते सत्य नसते. जे आहे, तेच खरे वास्तव आहे. जे आहे त्याचा विरुद्ध वास्तव नसते. पण जे मन सत्य शोधण्याची धडपड करते, ईश्वराचा शोध घ्यायला निघते, ते माहीत असलेल्या गोष्टीच शोधीत असते. जेव्हा तुम्ही ईश्वराबद्दल विचार करता तेव्हा तुमचा ईश्वर तुमच्या विचाराचीच निर्मिती असते, समाजाच्या संस्कारांचा, प्रभावांचाच तो परिणाम असतो. तुम्ही जे माहीत आहे त्याचाच विचार करू शकता. जे अज्ञात आहे त्याचा तुम्ही विचार करू शकत नाही; सत्यावर तुम्ही मन एकाग्र करूच शकत नाही. ज्या क्षणी तुम्ही अज्ञाताबद्दल विचार करता त्या क्षणी ते फक्त स्वत:च प्रक्षेप केलेले, माहीत असलेले असेच बनते. ईश्वर किंवा सत्य यांविषयी विचार, वितर्क संभवत नाही. तुम्ही त्याविषयी विचार केला तर ते सत्य उरत नाही. सत्य मागून मिळत नाही. ते स्वत: आपण होऊन तुमच्याकडे येत असते. जे माहीत आहे, त्याच्याच शोधार्थ, त्याचाच मागोवा घेत तुम्ही जाऊ शकता. पण जेव्हा ज्ञात अशा गोष्टींनी मन ग्रासलेले नसते, ज्ञाताच्या परिणामांनी ते गांजलेले नसते, तेव्हाच फक्त सत्याचा स्वयमेव आविष्कार होऊ शकतो. प्रत्येक पर्णात सत्य आहे. प्रत्येक अश्रुबिंदूत सत्य आहे, ते क्षणोक्षणी जाणून घ्यायचे असते. सत्याकडे तुम्हाला कोणीही घेऊन जाऊ शकत नाही. आणि कोणी घेऊन जातच असला तर तो ज्ञात अशा वस्तूकडेच नेऊ शकतो.

ज्ञात गोष्टींपासून जे मन मोकळे असते त्या मनालाच सत्य येऊन भेटू शकते. ते अशा अवस्थेत प्रकट होते की जेव्हा ज्ञात असे सर्व काही दूर गेलेले असते, निष्क्रिय असते. मन म्हणजे ज्ञात वस्तूंचे कोठार आहे, माहीत असलेल्या गोष्टींचा तो साठा आहे. अज्ञाताचा उदय होण्याच्या अवस्थेत मन राहायचे असेल तर त्याला स्वत:चे भान पाहिजे; त्याचे सर्व पूर्वानुभव, गम्य व अगम्य मानसिक स्तरावरीलही

अनुभूती, त्याचे प्रतिसाद, त्याच्या प्रतिक्रिया, त्याची रचना या सर्वांचे त्याला भान असले पाहिजे. जेव्हा स्वत:ची पूर्णपणे ओळख असते, जेव्हा आत्मबोध असतो, तेव्हा ज्ञाताचा शेवट होतो. मन हे ज्ञातापासून पूर्णपणे मोकळे होते आणि त्या वेळीच सत्य तुमच्याकडे न बोलाविता येत असते. सत्य ही काही तुमची किंवा माझी मालमत्ता नाही. सत्याची तुम्ही आराधना करू शकत नाही. ज्या क्षणी ते ज्ञाताच्या क्षेत्रात येते त्या क्षणी ते मिथ्या, असत्य असे होते. प्रतीक सत्य नसते, प्रतिमा सत्य नसते; पण जेव्हा स्वत:चा बोध होतो आणि 'स्व'चा, 'अहं' चा विलय होतो तेव्हाच शाश्वताचा आविर्भाव होतो.

*प्रथम अर्थात अंतिम मुक्ती,* प्रश्नोत्तरे ३

# जो मनुष्य सत्य शोधीत असतो त्याला गुरू पूर्णपणे अनावश्यक असतो

*प्रश्नकर्ता:* तुम्ही गुरूची गरज नाही हे निक्षून सांगत असताना सुद्धा तुम्ही स्वत:च गुरू नाहीत का? यात काय फरक आहे?

*कृष्णमूर्ती:* मित्रांनो, गुरू म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे? तुम्हाला गुरूची गरज का वाटते? तुम्ही मला गुरू केले किंवा नाही तरी मी स्वत:ला तुमचा गुरू करत नाही. म्हणूनच शिष्य हा शाप असतो. शिष्य, अनुयायी हा नाश करणारा असतो. शिष्य हा शोषण करणारा असतो. (हंशा) हे हसण्यावारी नेऊ नका. यावर अगदी प्रामाणिकपणे विचार करा आणि त्याचे परिणाम पाहा. या प्रश्नाचे आपण परीक्षण करुया. आता गुरू म्हणजे तुम्हाला काय वाटते? तुम्हाला सर्वसाधारणपणे असे वाटते, की जो तुम्हाला सत्याप्रत घेऊन जाईल तो तुमचा गुरू, नाही का? तुमचा गुरू असा मनुष्य नसेल की ज्याला तुम्ही स्टेशनकडे जाण्याचा मार्ग विचारू शकता. तुम्ही तुमच्या प्राध्यापकाला, तुम्हाला पियानो शिकविणाऱ्या माणसाला गुरू म्हणणार नाही. अर्थातच तुम्हाला असे म्हणायचे असते की जो तुम्हाला सत्याप्रत घेऊन जाईल तोच गुरू. जो तुम्हाला नीतिमत्तेचे धडे देईल, जो तुम्हाला किल्ली देईल किंवा जो दार उघडून देईल, जो तुमच्या सत्यशोधनाच्या प्रवृत्तीची जोपासना करेल, सत्यशोधन निरंतर चालू राहण्यासाठी सहाय्य करेल आणि तुम्हाला प्रोत्साहन देईल तोच गुरू. म्हणजेच जो तुम्हाला आत्यंतिक समाधान देईल तो तुमचा गुरू. तुम्हाला वरवरचे समाधान म्हणजे काय ते अगोदरच माहिती असते आणि तुम्हाला त्याहून अधिक सखोल असे समाधान पाहिजे असते. सखोल तृप्ती. म्हणून मग तुम्ही अशा व्यक्तीकडे वळता की जी तुम्हाला मदत करेल. तुम्ही गुरू शोधता कारण तुम्ही स्वत: गोंधळलेले असता आणि तुम्हाला मार्गदर्शन पाहिजे असते. कशी कृती करावी आणि काय करावे ते कोणीतरी तुम्हाला सांगायला पाहिजे असते, तेव्हा या सर्व गोष्टींचा त्यामध्ये समावेश आहे. परंतु गुरू म्हणजे आम्हाला मूलत: असे म्हणायचे असते की जो आपल्या जीवनातील समस्यांचा उलगडा करेल, तांत्रिक समस्या नव्हेत, तर अधिक सूक्ष्म, अज्ञात मानसिक समस्या.

आता, सत्याला काही चिरंतन स्थान असते का? सत्याला काही निश्चित असा बिंदू असतो का? सत्याला काही निवासस्थान असते का? की सत्य हे चैतन्यमय, जिवंत वस्तू असते आणि म्हणून त्याला विश्रांतिस्थळ नसते? सत्य हे सतत गतीशील असते, परंतु जर तुम्ही म्हणालात की ते एका निश्चित बिंदूपाशीच असते, तर तुम्हाला गुरू शोधावा लागेल जो तुम्हाला त्याच्याकडे घेऊन जाईल आणि मग मार्गदर्शक म्हणून गुरूची आवश्यकता भासेल. याचाच अर्थ असा होईल की तुम्ही आणि तुमचे गुरू दोघांनाही सत्य तेथे आहे हे माहिती असले पाहिजे, एका निश्चित जागी, जसे स्टेशन असते. मग तुम्ही मार्ग विचारू शकता, मग तुम्ही त्या निश्चित जागेकडे जाऊ शकता, आणि ते ध्येय गाठण्यासाठी तुम्हाला गुरूची गरज आहे, जो तुम्हाला मार्गदर्शन करेल आणि तुम्हाला त्या निश्चित जागेपर्यंत घेऊन जाऊ शकेल. परंतु सत्य हे निश्चित अशी वस्तू आहे का? आणि जर ती निश्चित असेल तर ते सत्य असेल का? आणि शिवाय जर तुम्हाला सत्य पाहिजे असेल आणि तुम्ही गुरूकडे गेलात तर तुम्हाला सत्य काय आहे ते माहिती पाहिजे नाही का? जेव्हा तुम्ही गुरूकडे जाता तेव्हा तुम्ही असे म्हणत नाही की मला सत्य शोधायचे आहे! याउलट तुम्ही म्हणता, सत्याचे दर्शन होण्यासाठी मला मदत करा. म्हणून अगोदरच ते काय आहे याची तुम्हाला कल्पना असते. त्याचा आशय तुम्हाला माहीत असतो, त्याचे सौंदर्य, त्याची प्रेममयता, त्याचा सुगंध तुम्हाला माहीत असतो. ते काय आहे ते तुम्हाला माहित आहे का? गोंधळलेल्या माणसाला स्पष्टता कशी माहीत असणार? त्याला फक्त गोंधळ माहीत असू शकतो किंवा 'जे आहे' त्याच्या विरोधात ती स्पष्टता असा तो विचार करतो. सत्य हे 'जे आहे' त्याच्या विरोधात असते का? गोंधळाच्या विरोधात असते का? जर तुम्ही सत्याविषयी विचार केला तर निश्चितच ती विचाराची निर्मिती असते आणि म्हणून ते सत्य नसते. आणि जर गुरू ते काय आहे हे सांगू शकला तर तोसुद्धा विचाराच्या कक्षेतच असतो. म्हणून तो जे तुम्हाला सांगतो ते सत्य नसते. तर मग जेव्हा तुम्ही गुरूकडे जाता तेव्हा अर्थातच तुम्ही समाधान मिळविण्यासाठी जात असता, नाही का? तुम्हाला तो शब्द कदाचित आवडणार नाही. तुम्ही अनेक प्रकारचे प्रयत्न केलेले असतात. तुम्ही प्रतिष्ठा, स्त्री, पैसा, यांच्यासह प्रयत्न केलेला असतो आणि ते तुम्हाला समाधान-सुख देऊ शकत नाहीत, ते तुम्हाला खात्रीचे सुख देऊ शकत नाहीत, खात्रीची शाश्वती. मग तुम्ही म्हणता, 'मी देवाचा शोध घेईन'. म्हणजेच तुम्हाला वाटते की, सत्य तुम्हाला अंतिम शांती देईल, अंतिम समाधान, अंतिम सुरक्षितता. तुम्हाला सत्य अशा प्रकारचे असायला आवडेल. परंतु ते अगदी धोकादायक असेल, विध्वंसक गोष्ट असेल. ते कदाचित तुमची पूर्वीची सारी मूल्ये नष्ट करून टाकेल. तुम्ही खरे तर सुरक्षितता, समाधान शोधत असता, परंतु तुम्ही त्याला तसे म्हणत नाही - तुम्ही त्याला ईश्वर म्हणून ते कवटाळता. समाधानाचे अनेक प्रकारचे प्रयत्न केल्यानंतर आणि नंतर वृद्ध झाल्यानंतर, संभ्रमित, तिरसट, निराश झाल्यानंतर तुम्ही देवामध्ये सुखी-समाधानी होण्याची आशा करता. म्हणून तुम्ही गुरूकडे जाता जो तुम्हाला हे समाधान देईल अशी तुम्हाला आशा असते आणि त्या समाधानाची तो जितकी अधिक आश्वासने देतो, तेवढी तुम्ही त्याची अधिक पूजा करता. दुसऱ्या शब्दात, जेव्हा तुम्ही गुरूकडे जाता, तेव्हा तुम्ही सत्य शोधत नसता, तर तुम्ही निराळ्या स्तरावर सुरक्षितता शोधत असता, निराळ्या अवस्थेत शाश्वती शोधत असता. परंतु सत्य शाश्वत असते का? तुम्हाला माहीत नाही, हो ना? परंतु तुम्ही तसे म्हणायला धजत नाही, कारण तसे मान्य करण्यासाठी, केवळ शाब्दिक नव्हे, तर प्रत्यक्ष आपल्याला ते माहीत नाही - हा अगदी उद्ध्वस्त करणारा अनुभव असतो. परंतु खरेच, तुम्हाला सत्य सापडण्यापूर्वी तुम्ही उद्ध्वस्त झालेले असला पाहिजेत. तुम्ही त्या अनिश्चिततेच्या अवस्थेत असले पाहिजे. पूर्णपणे निराश, कुठल्याही

पळवाटेशिवाय तुम्ही अगदी रितेपणाला, उजाडपणाला सामोरे गेले असले पाहिजे, कुठेही पळून जाण्याचा मार्ग शिल्लक न राहता. तेव्हाच फक्त सत्य काय आहे हे तुम्हाला सापडेल. परंतु त्याविषयी तर्क करणे, त्याविषयी विचार करणे म्हणजे सत्यालाच नाकारणे होय. तुमचे तर्क, तुमचे सत्याविषयीचे विचार याला काही अर्थ नसतो. तुम्ही जो विचार करता ती विचाराचीच निर्मिती असते. विचार ही स्मृती असते आणि स्मृती म्हणजे इच्छित फळाशी आपण केवळ एकरूप होणे असते. म्हणून जो मनुष्य सत्य शोधीत असतो त्याला गुरू पूर्णपणे अनावश्यक असतो. सत्य दूरवर नसते, सत्य जवळ असते, तुम्ही विचार करताना तुमच्या भावना असतात त्यामध्ये असते. तुमचे तुमच्या कुटुंबासह असलेले नातेसंबंध, शेजाऱ्यांबरोबरचे, तुमच्या इस्टेटीबरोबरचे, कल्पनांबरोबरचे नातेसंबंध यांमध्ये असते. कुठल्यातरी कल्पित क्षेत्रामध्ये सत्य शोधणे म्हणजे केवळ कल्पनाविलास असतो आणि आपल्यापैकी बहुतेकजण जीवनापासून पळ काढण्याच्या निमित्ताने अशा प्रकारचे सत्य शोधत असतात. जीवन आपल्यासाठी फारच ओझे झालेले असते, अगदी कष्टदायक, अगदी दु:खकारक. म्हणून जीवनापासून दूर असे सत्य आपण शोधत असतो, पाहत असतो. म्हणून आपण गुरू शोधतो, जो आपल्याला असे पळून जाण्यास मदत करतो आणि पळून जाण्यासाठी जेवढी तो अधिक मदत करतो तेवढे अधिक आपण गुरूचे भक्त होतो.

प्रश्नकर्ता मला विचारीत आहे, 'तुम्ही स्वत:च गुरू नाहीत का?' तुम्ही मला गुरू करू शकता, पण मी गुरू नाही. मला गुरू व्हायचे नाही. याचे साधे कारण असे की, सत्याकडे जाण्याला मार्ग नाही. तुम्ही मार्ग शोधू शकत नाही. कारण तिथे मार्गच नाही. सत्य ही अशी गोष्ट आहे की जी जिवंत आहे आणि अशा जिवंत गोष्टीसाठी तिथे मार्ग नसतो. फक्त मृत गोष्टीसाठीच तिथे मार्ग असू शकतो. सत्य हे पथहीन असल्यामुळे ते गवसण्यासाठी तुम्ही साहसी असले पाहिजे, धोक्यासाठी सज्ज असले पाहिजे. आणि तुम्हाला असे वाटते का, की गुरू तुम्हाला साहसी बनविण्यास मदत करू शकेल, संकटामध्ये जगण्यासाठी मदत करू शकेल? गुरू शोधणे म्हणजेच त्याचा अर्थ तुम्ही साहसी नाही आहात, तुम्ही सत्याकडे जाण्यासाठी केवळ मार्ग शोधत आहात, एक सुरक्षिततेचे साधन म्हणून. तेव्हा तुमची इच्छा असेल तर तुम्ही मला गुरू करू शकता, परंतु ती तुमची विपन्नावस्था असेल, कारण सत्याकडे जाण्यासाठी गुरूची आवश्यकता नाही, सत्याकडे जाण्यासाठी नेत्याची गरज नाही. सत्य हे वर्तमानात असणारे चिरंतन वास्तव आहे, भविष्यकाळात नव्हे, ते अगदी तत्काळ या क्षणामध्ये आहे, ते अंतिम उद्यामध्ये नसते. तो आत्ताचा क्षण समजण्यासाठी, तो शाश्वत काळ समजण्यासाठी, मन हे काळापासून मुक्त असले पाहिजे. विचार थांबला पाहिजे. तरीसुद्धा, जी प्रत्येक गोष्ट तुम्ही आता करीत आहात ती विचाराची जोपासना करीत असते आणि तुमचे मन संस्कारबद्ध करीत असते. त्यामुळे तिथे कधीही ताजेपणा नसतो, नावीन्यता नसते. तिथे स्तब्ध, शांत असा क्षण कधीच नसतो. जोपर्यंत विचारप्रक्रिया सुरू असते तोपर्यंत सत्य असू शकत नाही – याचा अर्थ असा नव्हे की तुम्ही पूर्णपणे विस्मृतीच्या स्थितीत असले पाहिजे. तुम्ही शांतता बळजबरीने आणू शकत नाही, तुम्ही मन शांत करू शकत नाही, तुम्ही विचाराला जबरदस्तीने थांबवू शकत नाही. तुम्ही विचाराची प्रक्रिया समजून घेतली पाहिजे आणि साऱ्या विचाराच्या पलीकडे गेले पाहिजे आणि केवळ त्यानंतरच सत्य विचाराला त्याच्या स्वत:च्या प्रक्रियेपासून मुक्त करेल.

*To Be Human*, पुणे, भाषण ६

# ते जे काही सांगत असतील त्याबद्दल साशंक असले पाहिजे

जेव्हा एखादा गुरू म्हणतो की, त्याला ज्ञानप्राप्ती झालेली आहे, तेव्हा त्याला ती झालेली नसते, बरोबर? मला काय म्हणायचे आहे ते तुम्हाला समजते आहे का? जेव्हा एखादा गुरू किंवा पाश्चात्य वा पौर्वात्य देशातील माणूस त्याला उद्‌बोधन (साक्षात्कार) प्राप्त झाल्याचा दावा करतो तेव्हा हे समजले पाहिजे की उद्‌बोधन ही कमावण्याची गोष्ट नाही, पायरी पायरीने चढून गाठण्याची ती गोष्ट नव्हे. सर्वात प्रथम हे कळले पाहिजे की, उद्‌बोधन हे कालाधीन नाही, कालावधीत मिळवण्याची गोष्ट नाही. मी काय म्हणतो हे आपल्याला समजते आहे का? म्हणजे, मी अज्ञानी आहे आणि काही गोष्टी केल्याने मी सज्ञानी होईन, उद्‌बोधन जो काही त्याचा अर्थ असेल – त्याप्रत मी पोहोचेन, बरोबर? काळ म्हणजे काय? इथून तिथे शारीरिकरित्या जाण्यासाठी वेळ लागतो. परंतु मानसिक स्तरावर वेळेची गरज आहे का? पण आपण तिचा स्वीकार केला आहे, आपल्या परंपरेचा, प्रशिक्षणाचा तो भाग आहे. मी आज असा आहे आणि उद्या तसा होईन. तुम्हाला काय व्हायचे आहे, ते केव्हाच घडणार नाही कारण 'जे काही आहे' हे तुम्हाला कळलेच नाही व त्याचा तुम्ही शेवटही करू शकला नाहीत. 'जे आहे' त्याचे आकलन तत्क्षणी होते. तुम्हाला त्याचे विश्लेषण करण्याची जरूरी नाही किंवा कष्ट, सराव करण्याचीही गरज नाही. खरे तर हा सगळा बालिशपणा आहे.

म्हणून उद्‌बोधन हा शब्द मला स्वत:ला वापरावासा वाटत नाही. कारण ह्या सर्व गुरूंनी त्याला दिलेल्या अर्थाने तो भारावलेला आहे. ते काय म्हणतात ते त्यांचे त्यांनाच माहीत नाही. असे नका समजू की त्यांना माहीत नाही आणि मला माहीत आहेत, असे म्हणणे हा माझा मूर्खपणा होईल. परंतु जेव्हा ते पायरी पायरीने, सरावाने उद्‌बोधन प्राप्त करण्याच्या गोष्टी करतात, तेव्हा त्यात काय सामावलेले आहे ते मला दिसते. त्यात तुमचे मन यांत्रिक, मंद व मूर्ख बनते.

म्हणून पहिली गोष्ट – मग ते गुरू पाश्चात्य असो किंवा पौर्वात्य – ते जे काही सांगत असतील त्याबद्दल साशंक असले पाहिजे, प्रश्न निर्माण केले पाहिजेत. हा वक्तादेखील त्यात आला, किंबहुना जास्तच प्रमाणात. या गोष्टीबद्दल मी अगदी स्पष्ट आहे. ह्याचा अर्थ असा नव्हे की मीच एक व्यक्ती अशी आहे, ते अधिकच मूर्खपणाचे ठरेल. परंतु मन सगळ्या अधिकारापासून, अनुयायांपासून, शिष्यत्वापासून, ठराविक साच्यापासून मुक्त हवे, समजले?

परंतु हे कसे ओळखायचे की हे गुरू सत्य सांगत आहेत? हे स्थानीय धर्मोपदेशक, धर्माधिकारी, धर्माध्यक्ष, पोप हे सर्वजण बोलतात त्यात सत्य आहे की नाही हे तुम्हाला कसे कळणार? भारतात जाऊन नवीन गुरूंचा स्वीकार करण्याऐवजी, ते बोलतात ते सत्य आहे का, हे कसे समजणार? प्रियजन हो, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कदाचित ते सर्वजण कपटकारस्थानात, पैसा, प्रतिष्ठा, अधिकार, दिक्षा देणे आणि इतर सारे काही यात गुंतलेले असतील. आणि तुम्ही जर प्रश्न विचाराल, 'ह्याचा तुमच्या मते अर्थ काय? तुम्ही अधिकाराच्या अधिष्ठानात स्वत:ला का बसवले आहे?' जर प्रश्न विचाराल, ते सांगतात त्या प्रत्येक गोष्टीवर शंका व्यक्त कराल, तर लवकरच तुमच्या लक्षात येईल की त्यांनी तुम्हाला बाहेरची वाट दाखवलेली असते, आले लक्षात?

एकदा काय झाले एक प्रसिद्ध गुरू वक्त्याला भेटायला आला. मी ही गोष्ट सहज जाता जाता सांगत आहे. तो म्हणाला, 'तुम्ही गुरूंचेही गुरू आहात'. (हंशा) 'तुम्ही जगता ते खरं आहे. तुम्ही बोलता ते सत्य आहे. तेच तुम्ही जगता.' त्याने लोटांगण घातले, तुम्हाला माहीत आहे का, त्याने माझ्या पायाला वाकून स्पर्श केला, आणि मग म्हणाला, 'मी गुरू आहे, मला खूप अनुयायी आहेत. आधी एक शिष्य होता. आता हजारावर आहेत. दोन्हीकडे – पाश्चिमात्य व पौर्वात्य देशात, विशेषत: पाश्चिमात्य देशात. मी त्यांना सोडू शकत नाही. ते माझ्या जीवनाचा हिस्सा आहेत आणि मी त्यांच्या जीवनाचा. त्यांनी मला उभारले व मी त्यांना घडवले.' समजले? लक्षपूर्वक ऐका. शिष्य गुरूला घडवतो व गुरू शिष्याला आणि 'मी त्यांना सोडू शकत नाही'. आणि हळूहळू आध्यात्मिक जगात अधिकार प्रस्थापित होतो. ह्यातील धोक्याची कल्पना येते का ? मनाच्या आणि बुद्धीच्या स्तरावर जेव्हा अधिकार निर्माण होतो तेव्हा तेथे प्रेम संपते. तेथे नकली प्रेम असते. ते गहिरे प्रेम, ती लागणी ह्यांचा तेथे मागमूसही नसतो.

आणि म्हणून कोण सत्य सांगतंय त्याचा वेध घ्या. सत्याच्या मागे लागू नका, नेहमी साशंक रहा. कारण सत्य ही अशी गोष्ट नाही की तिथे तुम्ही येऊन पोचणार. तुम्ही त्या सर्वातून मुक्त असता तेव्हा ते येते. कारण मगच ती करुणा, प्रेम संभवते जे तुमच्या गुरूसाठी, कुटुंबासाठी, तुमच्या ध्येयासाठी, प्रेषितासाठी नसते– प्रेम हेतुविरहित असते म्हणून ते कार्यरत असते, ते प्रज्ञेतून कार्यरत असते. सत्य दुसऱ्याकडून खरेदी करता येत नाही.

'आदरणीय जन हो', पूर्वेकडील व पश्चिमेकडील सर्व गुरू पुरातन संदेश सांगतात की तुम्हीच तुमचा प्रकाश आहात. ही भारतातील, पारंपारिक जुनी म्हण आहे. ते तिचा पुनरुच्चार करतात. परंतु 'आम्ही दिल्याशिवाय तो तुमचा होणार नाही,' बरोबर? तुम्हाला माहीत नाही की तुम्ही सहज फसणारे आहात. हेच खरे तर चुकते. तुम्हाला तरुणांना तसेच वृद्धांना काहीतरी हवे असते. मागच्या पिढीने ह्या जगाचे जे काही केले आहे त्यामुळे तरुण पिढीला ते कठोर व धक्कादायक झाले आहे. त्यांना ह्या जगात स्थान नाही. ते हरवलेत. मग ते मादक पदार्थ, मद्य ह्याच्या आहारी जातात. त्या जगात त्यांच्याबाबतीत सर्व काही घडत आहे – संघटना, लैंगिक स्वैराचार, कोणी तरी विश्वासार्ह मार्गदर्शन करील म्हणून शोध घेण्यासाठी भारताचा पाठलाग. काही माहीत नसताना तुम्ही तरुण, ताजेतवाने तिकडे जाता, गुरू त्यांना दिलासा देतात – तुमची काळजी घेतली जाईल, मार्गदर्शन मिळेल, हेच त्यांना हवे असते. ते त्यांना आई-वडिलांकडून, धर्माधिकाऱ्यांकडून, मानसशास्त्रज्ञांकडून मिळत नाही. कारण हे स्थानिक धर्माधिकारी, मानसशास्त्रज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ सर्व तितकेच गोंधळलेले असतात. म्हणून ते भारतात एका धोकादायक देशात येतात. अनेकांच्या पगड्यात अडकतात. ते तरुण शोधत असतात – सुखसोई, कोणीतरी त्यांची काळजी घेणारा, तुम्हाला काय करावे वा न करावे हे सांगणारा, त्यांची जबाबदारी घेणारा हवा असतो, ही सुखदायक समाधानी स्थिती असते आणि ते गुरू असे देखील सांगतात की, तुम्हाला हवे ते करा – मद्य, लैंगिक स्वैराचार वगैरे.

आणि जुनी पिढी पण त्याच अवस्थेत असते. फक्त ते कृत्रिम आधुनिकता दर्शवतात. तरुण व वृद्ध सारखेच असतात. हे जगात सतत घडत असताना तुम्ही पाहता. तेव्हा कोणी दुसऱ्याला मार्गदर्शन अथवा प्रकाश देऊ शकत नाही. फक्त तुम्ही तुम्हाला तो देऊ शकाल. प्रकाश तुम्हाला दिला जाणार नाही, तुम्हाला संपूर्ण एकटे उभे राहायला हवे. हेच सर्वांना भेडसावणारे आहे. कारण तुम्ही कुणाचे तरी होणे, अनुयायित्व पत्करणे त्यात भ्रष्टाचाराची सुरुवात असते. जर तुम्हाला हे खोलवर, साश्रु नयनांनी समजले तर मग तिथे गुरू, शिष्य, शिकवणारा असे काहीच राहत नाही. मग तुम्ही फक्त ह्या जगात – जे जग, समाज तुम्ही निर्माण केले आहेत – त्यात फक्त माणूस म्हणून जगता. तुम्ही तुमच्यामध्ये काय आहे हे समजला नाहीत तर समाज तुम्हाला मदत करू शकणार नाही. उलट समाजाला तुम्ही आहात तसे हवे आहात. हे सर्व तुम्हाला समजते आहे का? म्हणून कुणाच्या मालकीचे होऊ नका, कुठल्याही संस्थेचे, कुठल्याही संघटनेचे; कुणाच्याही मागे जाऊ नका, तुम्ही कुणाचेही अनुयायी नाही. परंतु तुम्ही ह्या भयानक जगात माणूस म्हणून जगत आहात, तुम्ही एक माणूस आहात – जो स्वत:च ते जग आहे आणि जग म्हणजे तुम्ही आहात. तुम्हाला तिथे जगायचे आहे, त्याचे आकलन करून घ्यायचे आहे आणि स्वत:च्या पलीकडे जायचे आहे.

सानेन १९८०, प्रश्नोत्तर सभा १

---

## हैद्राबाद येथील अध्ययन केंद्र

**नैमिषम्**, 'जिद्दू कृष्णमूर्ती सेंटर' हे आंध्र प्रदेशातील कोंडापूर गाव, घाटकेसर येथे हैद्राबादपासून सुमारे १ तासाच्या अंतरावर प्रस्थापित केले आहे. शेतमळे, टेकड्या आणि तलावाने वेढलेल्या २५ एकराच्या रम्य परिसरात हे अभ्यास केंद्र वसले आहे. ही शांत, निस्तब्ध वातावरण लाभलेली जागा अभ्यासकांना आत्मबोध घेण्यासाठी सुयोग्य आहे.



कृष्णमूर्तींची पुस्तके, ध्वनी-चित्रफिती, व्हिसीडीज्, डिव्हीडीज्नी सुसज्ज असे हे अध्ययन केंद्र आहे. अभ्यासकांना राहण्यासाठी येथे खोल्या तसेच स्वतंत्र कुटिरांची सोय आहे.

अभ्यासकांच्या गरजेनुसार येथे व्यवस्था होऊ शकते. उदाहरणार्थ एखाद्या विशिष्ट विषयाचा अभ्यास, पूर्णपणे मौन किंवा एकांत, किंवा दररोज काही ठराविक वेळाचे स्वयंसेवनवजा काम इ.; तसेच इथे नियमितपणे कार्यशाळा, लहान गटांच्या चर्चा, अभ्यास बैठका आयोजित केल्या जातात.

येथील वातावरणातील शांती अबाधित राहण्यास मदत होईल अशा प्रकारे आणि निसर्ग नियमांना अडथळा न आणता येथे नैसर्गिक शेती, पशुपालन आणि दुग्धोत्पादन करण्यात येते.

संपर्क : नैमिषम् जिद्दू कृष्णमूर्ती सेंटर,
घाटकेसर, कोंडापूर, आंध्रप्रदेश – ५०१३०१
दूरध्वनी : (०४०) २३३५७८८९. ईमेल : office@jkcentre.org

## श्रद्धांजली

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई चे सेक्रेटरी आणि निवृत्त इन्कम टॅक्स कमिशनर श्री. आर. आर. चारी यांचे चेन्नई येथे अल्पशा आजाराने दि. १२ ऑगस्ट २०११ रोजी निधन झाले. श्री. चारी ८४ वर्षांचे होते.

श्री. चारी यांचा अनेक सामाजिक तसेच क्रिडाविषयक संस्थांशी निकटचा संबंध होता. श्री. चारी यांच्या या सर्व ओळखींपेक्षा महत्त्वाचे म्हणजे ते एक सामाजिक जाणीव असलेले सहृदय प्रेमळ मित्र आणि एक उत्तम माणूस होते. त्यांच्याजवळ असलेली मानवतेची अपार करुणा त्यांच्या सहवासात येणाऱ्या असंख्य मित्रांना आणि सहकाऱ्यांना नेहमीच अनुभवायला येत असे.

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई केंद्रामध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचारी आणि कार्यकर्त्यांचे ते प्रेरणास्थान होते. आम्हा सर्वांचे ते आधारवड होते आणि श्री. चारी यांच्या आकस्मिक निधनाने हा भरभक्कम आधारवड आज कोसळून पडला आहे.

गेली जवळजवळ १५ वर्षे कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई केंद्राची धुरा त्यांनी आपल्या खांद्यावर समर्थपणे घेतली होती. या कालावधीत त्यांनी अनेक नवीन कल्पक उपक्रम होती घेतले आणि ते तडीस नेले.

असाच एक अनुभव आहे, बदलापूर जवळच्या 'आनंद-विहार' या कृष्णमूर्ती अध्ययन केंद्राच्या निर्मितीचा. हा प्रकल्प पैशाअभावी आणि योग्य मार्गदर्शनअभावी अर्धवट अवस्थेत बरेच दिवस पडून होता. पण चारींना कुठून आंतरिक प्रेरणा मिळाली ठाऊक नाही. त्या प्रकल्पाविषयी ते इतके झपाटले गेले की त्यांच्या इतक्या वर्षांचे व्यवस्थापकीय कौशल्य पणाला लावीत त्यांनी अनेक अशक्यप्राय वाटणाऱ्या अडचणी दूर केल्या. आणि आजचे हे 'आनंद-विहार' अध्ययन केंद्र उभे राहिले. त्यात अनेक माणसांचा हातभार लागला हे खरे आहे. परंतु तो प्रकल्प कार्यान्वित होण्यासाठी त्याला पहिली चालना देण्याचे काम चारी यांनी केले आहे. शेवटपर्यंत ते 'आनंद-विहार'विषयी आस्थेने चौकशी करत असत.

तर असे होते चारी. स्वभावाने कमालीचे शांत, निगर्वी, निर्मोही, मिश्किल आणि सदा हसतमुख, बरोबरच्यांना सदा आश्वासित करणारे एक दुर्मिळ व्यक्तिमत्त्व. कसलीही समस्या त्यांच्याकडे घेऊन गेल्यानंतर शांतपणे त्याचे निराकरण करायचे आणि काहीच न केल्यासारखे एखादा विनोद करीत वातावरण एकदम बदलून टाकायचे.

अशा या प्रसिद्धीपराङ्मुख, निष्काम, निरपेक्ष जीवनयोग्याला कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई केंद्रातर्फे विनम्र भावपूर्ण श्रद्धांजली.



## आता डोंबिवली येथे जे. कृष्णमूर्ती यांची पुस्तके उपलब्ध

आम्हाला कळविण्यास आनंद होत आहे की खालील ठिकाणी जे. कृष्णमूर्ती यांची इंग्रजी तसेच मराठीत अनुवादित पुस्तके आणि अंतरलहरीचे अंक आता उपलब्ध आहेत.

श्री. दिवाकर घैसास
अमोल बुक डेपो, फडके रोड, डोंबिवली (पूर्व), ठाणे - ४२१ २०१.
तेव्हा आता ठाणे, डोंबिवली, कल्याण परिसरातील अभ्यासकांची खास सोय झाली आहे.

> कृष्णमूर्तींच्या काही पुस्तकांच्या ब्रेलमधील आवृत्त्या तसेच ध्वनिमुद्रित पुस्तके नॅब (NAB- National Association for the Blind) राष्ट्रीय अंध संस्था, मुंबई येथे आणि भारतभरातील इतर तत्सम संस्थांच्या वाचनालयांमधून आमच्या अल्पदृष्टी असलेल्या मित्रांसाठी उपलब्ध आहेत.

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया या संस्थेने जे. कृष्णमूर्ती यांची पुस्तके महाराष्ट्रातील अनेक जिल्हा आणि तालुका स्तरावरील सरकारी किंवा निम सरकारी सार्वजनिक वाचनालयातून दिलेली आहेत. त्यातील काही वाचनालयांची नावे खाली देत आहोत.

१. समृद्ध सार्वजनिक वाचनालय: श्रीपाद, सिद्धेश्वर हाउसिंग सोसायटी, पोस्ट कॉलनी, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर - ४१४ ००१.
२. राजमाता जिजाबाई वाचनालय व ग्रंथालय : ३४९/२, कस्तुरबा भवन, बजाज नगर, नागपूर - ४०१ ०१०.
३. म्युनिसिपल कॉर्पोरेशन वाचनालय: पोस्ट बॉक्स - ६७, खाडकेश्वर रोड, औरंगाबाद - ४३१ ००१.
४. सावरकरप्रेमी मंडळ, मुक्तद्वार वाचनालय: मुरारजी कानजी धर्मशाळेमागे, सावरकर पथ, पंढरपूर, सोलापूर - ४१३ ३०४.
५. साहित्य निकेतन ग्रंथालय: मु. पो. ता. अंबाजोगाई, बीड (मराठवाडा), महाराष्ट्र - ४३१ ५१७
६. पू. सानेगुरूजी ग्रंथालय व मोफत व वाचनालय: अमळनेर - ४२५ ४०१ (जळगाव)
७. जीवन विकास ग्रंथालय: ग्रंथालय सदन, टिळक नगर, औरंगाबाद - ४३१ ००१.
८. रा. ब. अनंत शिवाजी देसाई वाचनालय: कुडाळ - ४१६ ५२० (सिंधुदुर्ग).
९. आपटे वाचन मंदिर: ६/२५४, राजवाडा चौक, इचलकरंजी - ४१६ ११५
१०. धों. शा. गरुड जिल्हा वाचनालय: धुळे
११. तरुण मित्र मंडळ (तालुका) वाचनालय: शिराळा, सांगली.
१२. खोपोली नगरपरिषद: रायगड
१३. विद्यार्थी वाचनालय: पाचगणी, सातारा
१४. श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालय: अक्कलकोट, सोलापूर.

जे कृष्णमूर्ती यांच्या शिकवणुकीच्या अभ्यासकांनी या वाचनालयातील पुस्तकांचा अवश्य फायदा घ्यावा. म्हणून ही माहिती येथे देत आहोत.

## नवीन प्रकाशने




किशोरवयीन मुले आणि युवकांसाठी पुस्तिका *(Booklets for Young People)* या मालिकेत तीन पुस्तके अलिकडेच प्रकाशित करण्यात आली आहेत– *Discover Your Hidden Talent; Does School Prepare You For Life?;* आणि *Have Strong Feelings : Don't be frightened of them.*

कृष्णमूर्तींनी विद्यार्थ्यांना उद्देशून केलेल्या भाषणांचे हे संकलन आहे. वाराणसीतील राजघाट बेझंट स्कूल आणि आंध्र प्रदेशातील ऋषी व्हॅली स्कूल येथे दिलेली ही भाषणे आहेत. पुस्तिकांची शीर्षके सूचित करतात त्याप्रमाणे माध्यमिक शाळा आणि उच्च-माध्यमिक विद्यालयांमधील किशोरवयीन आणि युवा मुलांना भेडसावणारे प्रश्न या भाषणांमधून हाताळले गेले आहेत. कृष्णमूर्तींनी दिलेले आव्हान मुलांवरती खचितच दृढमूल प्रभाव पाडेल.
किंमत प्रत्येकी १० रुपये.

### तुम्हीच विश्व आहात – *You Are the World*




कृष्णमूर्तींच्या अमेरिकेतील युनिव्हर्सिटीज्‌मध्ये झालेल्या भाषणांचे आणि चर्चांचे संकलन या पुस्तकात करण्यात आले आहे.

आज युवकांमध्ये विलक्षण आणि सखोल असा अस्वस्थपणा आहे. या असंतोषाला प्रतिसाद म्हणून जे. कृष्णमूर्तींचे शब्द प्रत्येक व्यक्तीला स्वत:च स्वत:चा गुरू आणि शिष्य होण्यास सांगत आहेत. आपण जसे प्रत्यक्ष आहोत तसेच स्वत:ला पाहण्यासाठी त्यांच्या शब्दांचा आरसा म्हणून उपयोग करण्यास ते सांगतात आणि जीवनाच्या समग्र अस्तित्वाचे दर्शन घेण्याचे सुचवितात.

फाउंडेशनच्या खास योजनेंतर्गत हे पुस्तक वाचकांसाठी खास सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे.
किंमत रुपये ४०/–

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी येथील अध्ययन कार्यशाळा:**
३० ऑक्टो. (सायंकाळपर्यंत आगमन) - ३ नोव्हेंबर २०११ **हिंदी संमेलन - स्वयं को समझने की आवश्यकता**
२६-२९ डिसेंबर, २०११ **आंतरराष्ट्रीय कार्यशाळा The Scientific and the Religious Mind**
कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१.
दूरध्वनी: ०५४२ - २४४१२८९ / २४४०४५३ • ईमेल: kcentrevns@gmail.com • वेबसाईट: www.j-krishnamurti.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बेंगलुरू येथील अध्ययन कार्यशाळा:**
०८-११ सप्टेंबर, २०११ What is Right Action?
१०-१३ नोव्हेंबर, २०११ Why do I Resist Change?
०८-११ डिसेंबर, २०११ Freedom from Fear
२३-३० डिसेंबर, २०११ ****Youth Gathering: What are You Doing with Your Life?**
२५-२९ जानेवारी, २०१२ Silence, Stillness, Meditation
संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कँपस, हरिद्वनम्, १७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बंगलोर-५६००६२.
दूरध्वनी: ०८० - २८४३५२४३ • ईमेल: kfistudy@gmail.com • वेबसाईट: www.kfistudy.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, वसंतविहार,** १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८. ईमेल: info@kfionline.org • वेबसाईट : http://www.kfionline.org
निवासी कार्यशाळा - (शुक्रवार सायंकाळ ते रविवार रात्रीपर्यंत) ३० सप्टेंबर ते २ ऑक्टोबर, २०११

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री येथील अध्ययन कार्यशाळा:**
०७-११ सप्टेंबर, २०११ The Unconditioned Mind

### वार्षिक संमेलन - २०-२३ नोव्हेंबर २०११

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाच्या विद्यमाने होणारे वार्षिक संमेलन यंदा पुण्याजवळील सह्याद्री अध्ययन केंद्र येथे २०-२३ नोव्हेंबर, २०११ या दरम्यान होणार आहे, सर्वांना खुल्या असलेल्या या संमेलनामध्ये सहभागी होणाऱ्या अभ्यासकांना आपल्या जीवनाचे पुनर्निरीक्षण करण्यास आणि परस्पर विचारांची, देवाणघेवाण करण्यास मदत होईल.भाषणे, गटचर्चा, कृष्णमूर्तींच्या भाषणांचे व्हिडिओ कार्यक्रम अभ्यासास आणि चिंतनास वेळ असे या कार्यक्रमाचे मुख्य स्वरूप असेल.

पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र.
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल - kfisahyadri.study@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

**ऋषी व्हॅली, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र,** ऋषी व्हॅली, जिल्हा चित्तूर, आंध्र प्रदेश - ५१७ ३५२.
दूरध्वनी: (०८५७१) २६०३७/६८६२२/६८५८२ • ई मेल: study@rishivalley.org • वेबसाईट : http://www.rishivalley.org

**उत्तरकाशी, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र,** पोस्ट रानारी, डुंडा ब्लॉक, जिल्हा उत्तरकाशी - २४९ १५१.
ईमेल: krc.himalay@gmail.com • दूरध्वनी:: ९४१२४३६४२९/९४१५९ ८३६९० • वेबसाईट: http://www.jkrishnamurtionline.org भारतीय भाषांमधील संकेतस्थळ

**कोलकाता, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र,** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, ३०, देवदार स्ट्रिट, कोलकाता - ७०० ०१९.
दूरध्वनी: ०३३-४००८२३९८ • ईमेल: kfikolkata@gmail.com

**कटक - ओरिसा, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र,** पुरीघाट रोड, तेलेंगा बझार, कटक - ७५३ ००९, ओरिसा.
दूरध्वनी: ०६७१-६४१७९९० • ईमेल: kficuttackcentre@sify.com

**आनंद विहार, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर** : आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३, महाराष्ट्र, • दूरध्वनी: ०८००७४३९७०२, (०२२) २५०१४०९४, २४२२३१९९ • ईमेल: zilog@vsnl.com

# बेंगलुरू अध्ययन केंद्र



कर्नाटकातील बेंगलुरू शहरापासून फक्त २५ कि. मी. दूर 'द स्टडी' हे कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र 'हरिद्वनम्' या वनराईने नटलेल्या एका निसर्गरम्य सुंदर परिसरामध्ये गेली २५ वर्षे कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या अभ्यासकांसाठी कार्यरत आहे.

इथला परिसर, इथली दाट हिरवाई आणि एकूणच शांत वातावरण आपल्याला स्वत:चे आत्मनिरीक्षण करण्यास इतके पोषक आहे की आपल्याला दुसऱ्या कुठच्याही मार्गदर्शकाची किंवा गुरूची गरज भासणार नाही. आपल्या दैनंदिन यांत्रिक जीवनापासून पूर्णपणे फारकत घेऊन, शांत होऊन स्वत:च्या जीवनाचे सिंहावलोकन करीत, कृष्णजींची शिकवण व आपले स्वत:चे जगणे याकडे तटस्थतेने पाहण्याची संधी हे अध्ययन केंद्र देत आहे.

**अध्ययन केंद्रातील उपक्रम:** इथे दर महिन्याला चार दिवसांच्या कार्यशाळा घेतल्या जातात, शिक्षक व पालकांसाठी अनौपचारिक अभ्यासवर्ग आयोजित केले जातात. तसेच सर्वसाधारण आध्यात्मिक विषयांमध्ये रस असणाऱ्या लोकांसाठी मासिक सभा घेतल्या जातात आणि कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीचा गंभीरतेने अभ्यास करू इच्छिणाऱ्यांसाठी खास अभ्यासवर्ग घेतले जातात.

या केंद्राचा एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे कृष्णजींची शिकवण अधिकाधिक लोकांपर्यंत पोचविणे हा असल्यामुळे कृष्णजींची इंग्रजी तसेच कन्नड अनुवादित पुस्तकांची विक्री अनेक माध्यमातून हे केंद्र करीत असते. तसेच कृष्णजींच्या इंग्रजी पुस्तकांचे कन्नड भाषेमध्ये अनुवाद करण्याचे कार्य याच केंद्राची भाषांतर समिती करीत असते. या समितीतर्फे 'सहपयणा' ही कन्नड भाषेतील तिमाही वृत्तपत्रिका प्रकाशित केली जाते. या पत्रिकेच्या माध्यमातून कृष्णमूर्तींची विषयवार भाषणे, केंद्रांच्या उपक्रमांची माहिती आणि फाउंडेशनच्या उपक्रम-मालिकांची माहिती जवळ जवळ १००० कन्नड भाषिक वाचकांपर्यंत पोचविली जाते. इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रिका ईमेल द्वारा पाठविण्यात येते.

येथे कृष्णमूर्तींच्या जवळ जवळ सर्व इंग्रजी तसेच कन्नड भाषेतील अनुवादित पुस्तकांनी सुसज्ज असलेले ग्रंथालय असून ती पुस्तके घेऊन तेथेच वाचण्याची व्यवस्था देखील उत्तम केलेली आहे. तसेच कृष्णजींच्या भाषणांच्या आणि मुलाखतींच्या डिव्हीडीज् उपलब्ध असून त्या पाहण्यासाठीची सोय केलेली आहे.

येथे राहण्यासाठी प्रत्येकाला स्वतंत्र कुटीर असून त्यामध्ये सगळ्या सोयी उपलब्ध आहेत. राहण्याजेवणाच्या खर्चासाठी प्रत्येक व्यक्तीला प्रतिदिन रु. ६००-१००० या दरम्यान प्रत्येकाच्या क्षमतेनुसार स्वेच्छेने आकार केला जातो. या केंद्राचे व्यवस्थापन आणि एकूणच दर्जा टिकविण्यासाठी हा आकार केला जातो.

ज्यांना या अभ्यासकेंद्राला भेट द्यावयाची असेल त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:
द स्टडी, व्हॅली स्कूल कँपस,
१७ कि.मी., कनकपुरा मार्ग,
थातगुणी पोस्ट, बेंगलुरू : ५६००६२
दूरध्वनी : (९१-८०) २८४३-५२४३
ईमेल : kfistudy@gmail.com

कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस्:
www.jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org

जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:**
कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : (०४४) २४९३७८०३/७५९६,
ई-मेल : kfihq@md2.vsnl.net.in
वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र** हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.

**संपर्क** :- कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
बॉम्बे एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल,
मुंबई-४००००६.दूरध्वनी - २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*

*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org

*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006.*
*Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : ipw@vsnl.net • Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*